दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, मंगळवार, दि.०८ ऑक्टोबर २०२४
वर्ष : ०४, अंक : ५५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## आजचा रंग लाल



नवरात्रातील दुर्गा देवीच्या सहाव्या रूपाचे नाव कात्यायनी देवी असे आहे. या देवीची उपासना केल्याने भक्तांना अर्थ, धर्म, कर्म व मोक्ष या चारही फळांची प्राप्ती होते. कट नावाच्या प्रसिद्ध महर्षींचा पुत्र कात्या व त्याचाही पुत्र कात्यायन यांनी खूप वर्षे भगवंताची कठोर तपस्या केली होती. त्यावेळेस भगवती देवीने त्यांच्या कुळात जन्म घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे भगवंतीने त्यांच्या या प्रार्थनेचा स्वीकारही केला व महिषासुराचा अत्याचार पृथ्वीतलावर वाढला, तेव्हा ब्रम्हा, विष्णू, व महेश या तिघांनीही आपल्या तेजाचा काही अंश देऊन महिषासुरमर्दनासाठी एका देवीला उत्पन्न केले.तिची सर्वप्रथम पूजा व आराधना कात्यायन यांनी केली त्यामुळेच तिचे नाव कात्यायनी देवी असे पडले. पुढे काही वर्षांनी तिने महर्षी कात्यायन यांच्या घरी जन्मही घेतला, व तिनेच विजयादशमीच्या दिवशी महिषासुराचा वध ही केला. कात्यायानी देवी अमाप फलदायी आहे. तिचे रूप तेजपुंज आहे. तिला चार भुजा आहेत. उजवीकडील भुजे मध्ये अभय मुद्रा व वरमुद्रा धारण केली असून डावीकडील भुजांमध्ये तलवार व कमलपुष्प धारण केले आहे. ती सिंहारूढ आहे. तिच्या भक्तीने तिच्या भक्तांचे रोग, भय यापासून मुक्तता होऊन, त्यांची सर्व पापे नष्ट होतात.

## महायुतीला तीन अंकी संख्याही गाठता येणार नाही

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पुणे :** महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते अशी स्थिती आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोहोंतील पक्षांनी विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. लोकसभा निवडणुकीत उत्तम यश मिळाल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. आता महाविकास आघाडीला १८३ जागा मिळतील असं भाकीत पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं आहे. तसंच महायुतीला तीन अंकी संख्याही गाठता येणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

कराड दक्षिण तालुका काँग्रेस कमिटी, पुणे पिंपरी चिंचवड रहिवासी यांच्यातर्फे निगडी प्राधिकरण या ठिकाणी असलेल्या ग.दि. माडगूळकर सभागृहात स्नेह मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार समीरण वाळवेकर यांनी पृथ्वीराज चव्हाण यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत त्यांनी महाविकास आघाडी १८३ जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केला.

**काय म्हणाले पृथ्वीराज चव्हाण ?**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. ६५ टक्के जागा आम्ही जिंकलो. या गोष्टीचा विचार केला तर आम्ही विधासभा निवडणुकीत १८३ जागा जिंकू शकतो, महायुतीचा विचार केला तर ते



तीन अंकी संख्याही गाठतील की नाही अशी स्थिती आहे. असं भाकीत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी वर्तवलं.

**महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण चिंताजनक...**

महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण चिंताजनक आहे असंही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. महाराष्ट्रात बारा बलुतेदार समाज, मराठा समाज, दलित समाज असे सगळे समाज खेळीमेळीने राहात होते. त्यांच्यात कधीही तेढ निर्माण झाली नव्हती. काही राजकीय पक्ष समाजांमध्ये तेढ निर्माण करत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचं सामाजिक स्वास्थ्य बिघडलं आहे. दलित समाजात बौद्ध आणि दलित तसंच हिंदू आणि दलित अशी विभागणी करुन तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. निवडणुकीच्या तोंडावर जातीय, धार्मिक दंगली घडवण्याचा प्रयत्न आहे असाही आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरही भाष्य...**

मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिलं होतं. फडणवीस सरकारला ते आरक्षण टिकवता आलं नाही. सध्या बेरोजगारीचा ज्वलंत प्रश्न राज्यात आहे. लोकांच्या हाताला काम नाही अशी स्थिती आहे. तसंच मागच्या दहा वर्षांत एकही मोठा उद्योग किंवा कंपनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी आलेली नाही. जे उद्योग येत होते ते गुजरातला पळवण्यात आले आहेत. महाराष्ट्रातलं वातावरण उद्योगनस्नेही नाही अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली. बेरोजगारीमुळेच आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे असाही आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

## सुरज चव्हाण एका बुक्कीत टेंगुळ देऊन झाला बिग बॉस सीजन ५ चा विजेता

**अक्षराज : शरद भगत**



**दि.०७, बारामती :** बारामती तालुक्यातील पश्चिम जिरायत भागातील मोढवे गावचा अनाथ मुलगा बिग बॉस च्या घरात जातो काय... फायनलमध्ये जिंकतो काय..... हे सर्व एक स्वप्न असल्या सारखे वाटेल. पण ही गोष्ट मोढवे येथिल अनाथ सुरज चव्हाणच्या बाबतीत घडली आहे. आई वडीलांच्या निधना नंतर अनाथ झालेला सुरज मरिमातेच्या नैवेद्यावर जगुन उधर निर्वाह करत होता. त्याच बरोबर वेठबिगारी (गवंड्याच्या हाताखाली) काम करुण अगदी पैसे ही न मोजता येणारा असा अगदीच सामान्य माणुस पण रिल्स वर व्हिडीओ बनवत स्वताच्या शैलित स्वता निर्माण केलेले डायलॉग वायरल करत टिक टॉक स्टार झाला. पण नशिबाने तीही संधी त्याच्या हातून हिसकावून घेतली.टिक टॉक वर बंदी आली व सुरजचे सोशल मिडीया वरचे डायलॉग पुन्हा काही प्रमाणात कमी झाले. मराठीत म्हण आहे... दैव देते, कर्म नेहते असच काहीशा प्रमाणात सुरजकजय बाबतीतझाले आहे.सुरज चव्हाण हा बिग बॉस सिजन पाच च्या घरात स्पर्धक म्हणुन सहभागी झाला. खरं तर सुरजचे दिसणे व बोलणे यावरून सुरजला अनेकांनी नावे देखील ठेवली. त्या नंतर त्याचे वागणे, खऱ्या आयुष्यातील कथा पाहून महाराष्ट्राने त्याला वोटींग रुपी आशिर्वाद दिले व विजयी बनवले. विविध क्षेत्रातून बिग बॉसमध्ये अनेक स्पर्धक सहभागी झालेले होते. अनेक दशके सिनेसृष्टी गाजवणाऱ्या अभिनेत्री वर्षा उसगावकर, पंढरीनाथ कांबळे, अभिजित सावंत, अंकिता वालवणकर, निकी तांबोळी, अरबाज पटेल, घनश्याम दराडे, वैभव चव्हाण असे अनेक मातब्बार मंडळी या सिजन मध्ये सहभागी होते. सुरज हा सामान्य कुटुंबातून सहभागी झाल्याने सर्व सामान्य जनतेला घरातील सदस्य वाटला. त्याच्या विजयाने मोढवे गावात यात्रेचे स्वरुप आले असून नागरिक त्याची वाट पहात आहे. सुरज आल्यानंतर जंगी मिरवणुक निघणार असल्याचे राजु राजपुरे यानीं सांगितले.

## लासलगावात दाम दुपटीच्या मोहाने हजारो नागरिकांना कोट्यावधींचा गंडा...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.७, लासलगाव (नाशिक) :** गेल्या आठ दिवसापासून कंपनीचा मास्टर माईंड अचानक गायब झाला. आर्थिक घेवाण चालू होती, परंतु देवाण बंद झाली. मास्टरमाइंड्सचा मोबाईल बंद असल्याने कोणाचाही त्याच्याशी संपर्क होत नव्हता. कंपनीची मॅनेजर असलेली मॅडम गुंतवणूकदारांना रोज वेगवेगळे खोटे कारण सांगत होती. अचानक समाज माध्यमांवर एक ऑडिओ क्लिप वायरल झाली आणि गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले.

लासलगाव मधे दुप्पट पैशाच्या अमीषाने, स्वस्तात प्लॉट आमिषाने हजारो मध्यमवर्गीय गरीब लोकांना करोडोंचा गंडा घालून त्यांना कंगाल केल्याची घटना सात वर्षांपूर्वी घडलेली असून,

त्याच गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या भामट्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत लासलगाव सह महाराष्ट्रभर तब्बल आठ हजाराहून अधिक नागरिकांची कोटयवधींची माया डबल करण्याच्या हेतूने आमिष दाखवून गोळा करून आज कंपनीने कुलप बंद करून पसार झाल्याची चर्चा लासलगाव परिसरात सुरू आहे. दाम दुपटीच्या आशेने लोक पैसे गुंतवतात, परंतु या साखळीचा शेवट काय शेवटी गुंतवणूकदारांची फसवणूक १००% होतेच असे असूनही या कंपनीने फसवणूक केलेल्या लोकांच्या रकमेचा. हा अकडा तीन कोटींच्या घरात असण्याची शक्यता आहे. स्वस्तात सोने, दोन महिन्यात दाम दुप्पट या शेअरमार्केट ट्रेडिंग अशा युक्त्यांचा वापर करून हा हायटेक गंडा घालण्यात आला आहे.

ही कंपनी सुरुवातीला पाच हजार रुपयांच्या बदल्यात एका महिन्यात दहा हजार रुपये देत होती. लोकांची हाव वाढत गेली. चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं पाहुन कंपनीने तीस दिवसात एक लाखावर दोन लाख परतीची योजना काढल्यावर, अनेकजण तुटुन पडले. अनेकांनी दागिने गहाण ठेवून पैसे गुंतवले असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे .



अजब म्हणजे फसवणुक होत असलेल्या अनेक लोकांना ही बोगस कंपनी आहे, एकनाएक दिवस बंद पडेल हे चांगले माहिती आहे. पण सुरुवातीला हमखास मोबदला मिळाल्याने जितके दिवस दामदुप्पट मोबदला घेता येईल अशा प्रयत्नात हे गुंतवणुकदार होते.आपल्याला पैसे मिळतात म्हणून मित्रांना आणि नातेवाईकांना मिळवून देण्यासाठी अनेकांनी आग्रह करून गुंतवणूक करण्यास भाग पाडले आहे.

वर्क फॉर होम नावाने बेरोजगार तरुणांची भरती करून पगार व इन्सेटिव्ह आमिषाने अनेक भोळ्या भाबड्या बेरोजगार तरुणांना सहभागी करून घेऊन ग्राहक आणल्यावर मोठे कमिशन देऊन मासिक पगार सुरु केल्यानंतर जास्तीत जास्त गुंतवणुकदारांना सहभागी करुन घेण्याची चढाओढ या पंचक्रोशीत सुरु झाली आहे. गेल्या आठ महिन्यात या स्किममध्ये निफाड तालुक्यात हजारो लोकांनी आपले पैसे गुंतवल्याचे माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या कंपनीने महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी शाखा स्थापन केलेल्या असून, अचानक या सर्व शाखा बंद पडल्याने गुंतवणूकदारांमध्ये खळबळ उडाली आहे. अजून पर्यंत तरी कुठल्याही गुंतवणूकदाराने पोलीस तक्रार केली नसल्याचे समजते.

जिथे लालच जास्त तिथे धोका हे वाक्य नेहमी लक्षात ठेवून आपल्या बचतीची गुंतवणूक योग्य ठिकाणी करणे यातच शहाणपण आहे.

मास्टर माईंड अचानक गायब झाल्यानंतरच्या आठ दिवसाचे कलेक्शन कोणी गडप केले याचीही चर्चा लासलगावात सुरू आहे.

## धनगर आरक्षणातला अडथळा दूर... धनगड प्रमाणपत्राबाबत राज्य सरकराचा मोठा निर्णय

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.०७, मुंबई :** राज्यातील महायुती सरकारने धनगर आरक्षणासंदर्भात मोठं पाऊल उचललं आहे. धनगरांना आरक्षण मिळण्यात असलेला सर्वात मोठा अडथळा दूर करण्यात आला आहे. राज्यात धनगड असा उल्लेख असलेली ७ प्रमाणपत्रं रद्द करण्यात आली आहेत. यामुळे धनगरांचा आरक्षणाचा मार्ग मोकळा होणार आहे.

राज्यातल्या धनगडांचे सहा दाखले रद्द झाले आहेत. संभाजीनगर जिल्ह्यातील ही प्रमाणपत्रं असून यामुळे धनगड अशी जातच अस्तित्वात नसल्याचा सिद्ध होणार आहे. विधानसभा निवडणुकीआधी राज्य सरकारने हा निर्णय घेत धनगर समाजाला मोठा दिलासा दिला आहे जात पडताळणी समितीने एकदा दिलेला दाखला रद्द करण्याचा अधिकार जात पडताळणी समितीला नव्हता. तो अधिकार जात पडताळणी समितीला देऊन जे बोगस धनगडांचे दाखले काढले होते. ते ६ दाखले रद्द केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे धनगर समाजाकडून मनःपूर्वक आभार मानले जात आहे. यामुळे धनगर एसटी आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अशी प्रतिक्रिया भाजप नेते गोपिचंद पडळकर यांनी दिली.

**कोणाची प्रमाणपत्रे रद्द झाली?**

१) भाऊसाहेब नामदेव खिल्लारे
२) रमेश नामदेव खिल्लारे
३) कैलास नामदेव खिल्लारे
४) मंगल नामदेव खिल्लारे
५) सुभाष नामदेव खिल्लारे
६) सुशिल भाऊसाहेब खिल्लारे
७) सागर कैलास खिल्लारे

या ७० वर्षांपासून धनगर आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे. धनगर समाजाच्या नेत्यांकडून धनगर-धनगड एक असल्याचा अध्यादेश काढावा अशी मागणी केली जात होती. तर धनगड वैधता प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी करण्यात येत होती. धनगड जात अस्तित्वात नाही. धनगड हेच धनगर आहेत अशी मागणी धनगर बांधवांची होती. गेल्या अनेक वर्षांपासून धनगर आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे. धनगर समाजाच्या नेत्यांकडून धनगर-धनगड एक असल्याचा अध्यादेश काढावा अशी मागणी केली जात होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचे आ.महेंद्र थोरवे यांच्या हस्ते भूमिपुजन

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०७, कर्जत :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भवनाचा ऐतिहासिक भव्य भूमिपूजन सोहळा रविवार, दि. ६ ऑक्टोंबर रोजी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते पार पडला आहे. कर्जतमधील भिम अनुयायांचा अनेक वर्षापासुन सुरू असलेला संघर्ष हा प्रत्यक्षात साकार होत असल्याने या ऐतिहासिक भव्य भुमिपुजन सोहळ्यास कर्जत तालुक्यातील भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी ढोल ताशाच्या गजरात भव्य अशा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तर ऐतिहासिक भव्य भूमीपूजन सोहळ्याची सांगता रॉयल गार्डन येथे भव्य सभेत रूपांतर होऊन करण्यात आली.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी ५ कोटीचा निधी आमदार महेंद्र थोरवे यांनी मंजूर करून घेत आणि कर्जत नगर परिषदेतील फायर ब्रिगेड ऑफिस शेजारी असलेल्या जागेत



दि.६ ऑक्टोंबर रोजी आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ऐतिहासिक वास्तूचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

भूमिपूजन सोहळ्याची सुरूवात कर्जत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून झाली. कर्जत तालुक्यातील सर्व भीम अनुयायी यांनी ढोल ताशाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते सुरभी ज्वेलर्स, श्रीराम ब्रीज, भूमिपूजन अशी रॅली काढली. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ऐतिहासिक वास्तूचे भूमिपूजन झाल्यानंतर रॉयल गार्डन येथे भव्य सभा झाली. यावेळी संतोष भोईर, राहुल डाळिंबकर, हिरामण गायकवाड, नरेंद्र गायकवाड, सचिन भालेराव, अॅड. सुमित साबळे, सिद्धार्थ सदावर्ते, अरविंद गायकवाड, मनोहर थोरवे, संकेत भासे, दिनेश कडू , तुषार कांबळे आदी मान्यवर तसेच तमाम भीम अनुयायी यांची उपस्थिती होती.

मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी दिलेला शब्द माझ्या नेतृत्वाने पूर्ण केला आहे. माझे नेतृत्व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कर्जत येथे दि. ७ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी ५ कोटीचा निधी मंजूर करील असा शब्द दिला होता. तो शब्द त्यांनी पूर्ण केल्याने आज दि. ६ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भवनाचे ऐतिहासिक भव्य भूमिपूजन हे माझ्या हस्ते झाले. याबद्दल मला माझ्या नेतृत्वावर सार्थ अभिमान आहे. मी व माझे नेतृत्वाने दिलेल्या शब्दाला आम्ही जागलो. तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीदरम्यान सर्व भीम अनुयायी माझ्या पाठीशी उभे राहाल असा विश्वास व्यक्त करतो.

**- महेंद्र थोरवे (आमदार कर्जत - खालापूर विधानसभा)**

आमदारांना माझा हॅट्स ऑफ...मुख्यमंत्री महोदय व आमदार थोरवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासंदर्भात दिलेला शब्द त्यांनी पाळला आहे. तर बाबासाहेबांच्या शिकवणीप्रमाणे खाल्लया मिठाला जागणारी आपली जात आहे. तर आपले डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आता प्रत्यक्षात साकारणार असल्याने आपला समाज हा आमदार थोरवे यांच्या पाठीशी उभे राहून, येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत पाच वर्षासाठी आमदार थोरवे यांना निवडून देण्याचे आवाहन मी माझ्या तमाम भीम अनुयायी यांना करतो.

**- राहुळ डाळिंबकर (माजी नगराध्यक्ष, कर्जत नगर परिषद)**

## तुळजापूर बसस्थानकातील बंद पंख्यामुळे प्रवासी घामाघुम

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०७, धाराशिव :** तुळजापूर शहरातील बसस्थानकातील सर्वच्या सर्व पंखे बंद असल्याने प्रवाशी घामाघुम होत आहेत. तर बसस्थानकात काही ठिकाणी पंखेच नाहीत तर काही ठिकाणी पंख्यांची पातीच गायब झाल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रौत्सवास घटस्थापनेने मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला असून महाराष्ट्रासह देशभरातील विविध राज्यातुन देविभक्त तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूरात येत आहेत. एस टी चा प्रवास सुखाचा प्रवास असल्याने व नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर एस टी बसस्थानकात दर्शनासाठी येणाऱ्या व दर्शन घेऊन परत जाणार्या भाविकांची गर्दी होत आहे. दररोज हजोरोंच्या संख्येने नागरीक भाविकांची ये जा होते आहे तुळजापूर बसस्थानकातील सर्वच्या सर्व पंखे बंद अवस्थेत असल्याने भाविक घामाघुम होताना दिसत आहेत. तसेच बसस्थानकात काही ठिकाणी पंखेच नाहीत तर काही पंख्यांची पातीच गायब झाल्याचे दिसून येत आहे. संपूर्ण बसस्थानकात फक्त चौकशी खिडकीतील एकच पंखा रात्रंदिवस चालु असल्याचे आढळून आले आहे.

अक्षराज

## संपादकीय



### 'आखाता'तील संघर्ष वाढणार

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यातच हमासने इस्त्राईल वर हल्ला करून इस्त्राईलचे १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्त्राईलने गाझा पट्टीवर वर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्त्राईलने केलेल्या हल्ल्यात ४२ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून हमासचे १२ हजारांहून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. इस्त्राईल – हमास युद्धाला आज एक वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. इस्त्राईल – हमास युद्धाला एक वर्ष पूर्ण होत असतानाच इस्त्राईलने लेबनॉनवर हल्ला केला. इस्त्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसराल्ला हा ठार झाला. त्या अगोदर इस्त्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्त्राईलने लेबनॉन वर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्त्राईल – हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्त्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले. इस्त्राईल – हमास नंतर इस्त्राईल – लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्त्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्त्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली असा उल्लेख मी वर केला आहे त्याचे कारण इराण या युद्धात उडी घेईल असा अंदाज गेली वर्षभर लावला जात होता कारण इस्त्राईल – इराण संघर्ष जगाला नवीन नाही. या आधीही या दोन देशात युद्धाचा भडका उडाला आहे. १९८० सालच्या दशकात तर दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्त्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. अर्थात इस्त्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्त्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्त्राईलने दिला आहे. याचाच अर्थ आगामी काळात इस्त्राईलकडून इराणवर हल्ला करण्यात येईल आणि जर तसे झाले तर हे युद्ध आणखी वाढू शकेल त्यात अमेरिकेने नेहमीप्रमाणे यात नाक खुपसले आणि इस्त्राईल पाठिंबा दिला. अमेरिकेने इस्त्राईलला पाठिंबा दिल्याने इराण आणखी खवळला कारण इराण इस्त्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानतो. अमेरिकेत सध्या निवडणुकीची लगबग चालू आहे. या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे असलेले डोनाल्ड ट्रम्प यांनी तर इस्त्राईलला चिथावणी देत म्हंटले आहे की इस्त्राईलने इराणच्या आण्विक तळावर आणि तेलाच्या विहिरींवर हल्ला करावा. जर मी म्हणजे ट्रम्प जिंकून आलो तर इस्त्राईलच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून इराणला त्यांची जागा दाखवून देईल. उद्या जर डोनाल्ड ट्रम्प खरेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले तर हा संघर्ष आणखी वाढेल. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्त्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प जर निवडून आले तर ते इस्त्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराण ला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यावी.

# पांढरं सोनं म्हणून ख्यातकीर्त



जागतिक कापूस दिन दरवर्षी ७ ऑक्टोबरला साजरा केला जातो. कापूस या महत्त्वपूर्ण पीकाचे जागतिक अर्थव्यवस्थेतील म हत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या योगदानाला सन्मान देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांची अविभाज्य विकास संघटना– युएनसीटीएडीने सन २०१९ साली जागतिक कापूस दिनाची स्थापना केली. वस्त्रप्रावरणाच्या निर्मितीकरिता लागणाऱ्या वनस्पतिज धाग्यासाठी उपयुक्त असलेली कापूस ही एक वनस्पती आहे. या वनस्पतीच्या बोंडातून मिळणाऱ्या पांढऱ्या शुभ्र तंतूमय भागालाही कापूस असे म्हणतात. कापासाच्या रानटी अवस्थेतील काही जाती उष्ण प्रदेशांत आढळत असल्याने तो मूलत: उष्णदेशीय असावा असे मानतात. कापूस व कापसाच्या सुती वस्त्रांसाठी होणारा उपयोग यांविषयीचे ज्ञान भारतीयांना फार पूर्वीपासून होते. ऋग्वेदात कापसाचा उल्लेख आहे. मनूनेही धर्मशास्त्रात सुती वस्त्रांचा उल्लेख केलेला आहे. ज्ञात असे सर्वांत जुने कातलेले सूत मोहों–जो–दडो येथील उत्खननात सापडलेले आहे. यावरून इ.स.पू.३००० वर्षांपूर्वी भारतात कापूस लागवडीत होता असे दिसते. इतर ज्ञात प्राचीन सुती वस्त्रे म्हणजे इंका संस्कृतीच्या पूर्वीच्या काळातील पेरू देशातील थडग्यात सापडलेले कापड, इतिहासपूर्व काळातील ॲरिझोनाच्या प्वेब्लो भग्नावशेषात सापडलेले कापड वगैरे होत.

इ.स.पू.१५०० ते इ.स. अठराव्या शतकापर्यंत म्हणजे जवळ–जवळ ३,३०० वर्षे भारत कापूस उद्योगावर आघाडीवर होता. त्यानंतर मात्र इंग्रज सरकारच्या धोरणामुळे भारतीय कापूस उद्योगावर प्रतिगामी परिणाम झाला. भारतातूनच कापसाचा व कापड विणण्याच्या कलेचा भूमध्य समुद्रालगतच्या देशांत आणि यूरोप खंडात प्रसार झाला. हीरॉडोटस– इ.स.पू.४५० यांनी भारतीय स्त्रिया सुती वस्त्रे कशा विणीत असत त्याचे वर्णन केलेले आहे. भारतीय अतिथ्य, शौर्य व स्वाभिमान यांविषयी अलेक्झांडर (इ.स.पू.३२७) जितके प्रभावित झाले होते, तितकेच ते येथील कापूस उद्योगाविषयी व भारतीयांच्या सुती कपड्यांविषयीही प्रभावित झाले होते. विशिष्ट रानटी झाडे फळाऐवजी लोकर देतात आणि या लोकरीचे सौंदर्य व प्रत मेंढ्यांपासून मिळणाऱ्या लोकरीपेक्षा अत्यंत श्रेष्ठ आहे. भारतीय लोक त्यापासून तयार केलेले कपडे घालतात, असा उल्लेख अलेक्झांडर यांनी केला होता. इतकेच नव्हे तर त्यांनी भारतातून परतताना कापूस ईजिप्त, ग्रीस व इतर भूमध्य समुद्रालगतच्या देशांमध्ये नेला. गंगेच्या खोऱ्यातील उत्कृष्ट मलमलीला ग्रीकांनी गंगेवरून ऋगँजिटिकी' असे नाव दिले. थीओफ्रस्टस यांनीही आपल्या वनस्पतिविज्ञानाच्या ग्रंथात भारतीय कापसाचे वर्णन केले आहे. ईजिप्तमध्ये जरी फ्लॅक्स उद्योगाला अग्रस्थान होते, तरीसुद्धा काही काळानंतर म्हणजे इ.स.६००पासून तेथे कापूस पिकवून त्यापासून कापड बनविण्याचा उद्योग सुरू झाला. भारतातून कापसाचा प्रसार केवळ पश्र्चिमेकडेच नव्हे तर पूर्वेकडेही झाला. इ.स.सातव्या शतकात कापूस भारतातून चीनमध्ये गेला. सुरुवातीला शोभेची झाडे म्हणून चिनी लोक कापसाची झाडे आपल्या बागेत लावत असत. सुमारे नवव्या शतकानंतर तेथे कापसाची मोठ्या प्रमाणावर लागवड होऊन त्यापासून सूत व कापड निर्माण होऊ लागले.

मेक्सिकोत कापसाच्या बोंडाचे अस्तित्व जरी इ.स.पू.५००० वर्षे इतके प्राचीन असले, ती तेथे कापसाचा कापडासाठी उपयोग फक्त इ.स.पू.२५०० वर्षांपासूनच माहीत होता, असे ज्ञात पुराव्यावरून दिसते. त्याच सुमारास पेरू देशातील लोकही कापूस लावून त्यापासून कापड निर्माण करीत असत. कापसाच्या भरपूर पुरावठ्यासाठी इ. स. पंधराव्या व सोळाव्या शतकांत निरनिराळ्या संशोधन सफरी योजण्यात आल्या होत्या. १४९२ मध्ये कोलंबस यांना वेस्ट इंडीजमधील स्थानिक रेड इंडियन रहिवाशांनी कापसाचे सूत भेटी दाखल दिले होते. इ.स.सतराव्या शतकात इंग्रजांनी उ.अमेरिकन वसाहतीत कापसाची लागवड केली. या लागवडीतूनच आजच्या अमेरिकेतील आधुनिक कापड व्यवसाय उदयाला आला आहे. यूरोपमध्ये आधीच तो व्यवसाय व्यापारी प्रमाणावर चालू होता. कापूस ज्या झाडापासून मिळतो त्याला कपाशी, हिंदी व गुजराती– कपास, रुई–कन्नड, हति–संस्कृत– कार्पास, इंग्रजी–कॉटन, लॅटीन. गॉसिपियम, कूल– माल्व्हेसी असे म्हणतात. कापसाच्या अनेक जाती असून त्या गॉसिपियम या वंशात समाविष्ट आहेत. या वंशात काहींच्या मते ३०च्या वर जाती आहेत, तर काही तज्ञांच्या मते या वंशात मुख्य अशा तीनचारच जाती असून सर्व त्यांचे प्रकार आहेत. ही उंच वाढणारी, वर्षायू किंवा बहुवर्षायू– एक किंवा अनेक वर्षे जगणारी ओषधी किंवा क्षुप–झुडूप असून तिची उंची सु १.५–२.५ मी.पर्यंत असते. खोडावर भरपूर प्रमाणावर फांद्या येतात. सामान्य शारिरीक लक्षणे– माल्व्हेसी कुलात वर्णिल्याप्रमाणे. पाने साधी, हस्ताकृती, ३–९ खंडात विभागलेली, कधी अखंड व मध्यम आकाराची असून फुले पांढरी, पिवळी किंवा जांभळट असतात. अपिसंवर्त ३–५ छदांचा संवर्त पाच संदलांचा व पुष्पमुकुट पाच पाकळ्यांचा असतो. केसरदले एकसंध किंजपुटात ३–५ कप्पे– फूल व प्रत्येकात ३–११ बीजके– सरकी बोंड पुटक भिदुर (किंजदलाच्या मध्य अक्षांवर फुटणारे) बिया काळसर लहान, अनियमितपणे गोलसर व कमी जास्त लांबीच्या पांढऱ्या नाजूक धाग्यांनी वेढलेल्या असतात. हे धागे म्हणजेच कापूस होय. सरकी काढून टाकलेल्या कापसाला रुई किंवा रू म्हणतात. कापसाचे काही प्रकार बागेत शोभेकरिता लावतात.

कपाशीच्या मुख्यतः लागवडीत असलेल्या चार जाती म्हणजे (१) गॉसिपियम अर्बोरियम (देवकापूस), (२) गॉसिपियम हर्बेशियम, (३) गॉसिपियम हिरसुटम आणि (४) गॉसिपियम बार्बाडेन्स. यांच्यापैकी अर्बोरियम मूळची भारतातील आहे असे समजतात. मोहें–जो–दडो येथील उत्खननात सापडलेले धागे अर्बोरियम जातीचे आहेत असे सिद्ध झालेले आहे. दुसरी जात मध्यपूर्व देशांतून भारतात आणलेली आहे. तिसरी जात अमेरिकन असून ती ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आणली आहे. चौथी जात मूळची पेरू देशातील आहे. अर्बोरियम कापूस आखूड धाग्याचा व जाडाभरडा असतो, पण या जातीतील कसही प्रकारांचा मध्यम आणि साधारण नरम असतो. ही जात कापूस पिकविणाऱ्या सर्व प्रदेशांत लागवडीत आहे. हर्बेशियमचा धागा अर्बोरियमच्या धाग्यापेक्षा लांब व बारीक असतो. त्याची लागवड गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश व कर्नाटक या राज्यांत होते. हिरसुटमचा धागा वरील दोन्ही जातींच्या धाग्यांपेक्षा मध्यम ते लांब आणि बारीक व मृदू असतो. ही जात पंजाब, पश्र्चिम उत्तर प्रदेश, राजस्थानचा बिकानेर भाग, आंध्र प्रदेशाचा काही भाग, तमिळनाडू व महाराष्ट्र राज्यांत जास्त प्रमाणांत लावतात. या जातीची लागवड कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यांत वाढत आहे. बार्बाडिन्स या जातीची लागवड कर्नाटक, आंध्र प्रदेश व तमिळनाडू या राज्यांत करण्यात येते.

जागतिक कापूस दिवस म्हणजे दरवर्षी ७ ऑक्टोबर रोजी आयोजित केला जातो, जागतिक कापूस दिन हा कापसाचा उत्सव आणि त्याचे कायमस्वरूपी सकारात्मक परिणाम दर्शविण्याची संधी आहे. जागतिक समुदायाला जगातील सर्वात महत्वाचे नैसर्गिक फायबर साजरे करण्यासाठी आपण सामील होण्यासाठी आमंत्रित केले आहे! जागतिक कापूस दिवस महत्त्वाचा आहे, कारण कापूस हा नैसर्गिक फायबर आहे जो इतर नाही. येथे फक्त काही कारणे आहेत. जगातील काही कमी विकसित देशांमध्ये हे दारिद्र्य–निर्मूलन करणारे पीक आहे, जे जगभरातील लोकांना शाश्वत आणि सभ्य रोजगार प्रदान करते. आईसीएसीचा अंदाज आहे की प्रत्येक टन कापूस लिंट सुमारे पाच लोकांना पूर्ण–वेळ, वर्षभर उत्पन्न प्रदान करते.

जगभरातील तब्बल ४३ टक्के कापूस उत्पादक महिला आहेत, त्यांना त्यांच्या कुटुंबांना उदरनिर्वाहासाठी आवश्यक उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध आहे.

कापूस कार्बन सोडवतो! उत्पादनादरम्यान, कापूस सुमारे १.७ किलो हरितगृह वायू निर्माण करतो, परंतु तो २.२ किलो शोषून घेतो, म्हणजे कापूस अक्षरशः वाढतो तेव्हा वातावरणातून कार्बन काढून टाकतो.

सिंथेटिक पर्यायांच्या तुलनेत ते त्वरीत बायोडिग्रेड होते, आपल्या जलमार्गांमध्ये प्रवेश करणाऱ्या प्लास्टिकचे प्रमाण कमी करते आणि आपले महासागर स्वच्छ ठेवण्यास मदत करते. हे मानव आणि पशुधन दोघांनाही फायबर पण अन्न पुरवते. रखरखीत हवामानात उगवणारे पीक म्हणून, इतर कोणतेही पीक घेऊ शकत नाही, अशा ठिकाणी ते फुलते.

**!! आंतरराष्ट्रीय कापूस दिन सप्ताह निमित्त सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

– संकलन व सुलेखन –
**श्री.कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पोटेगावरोड, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप– ९४२३७१४८८३.**

## कात्यायनी मा..

या देवी सर्व भुतेषु
कात्यायनी संस्थिता
कात्यायन ऋषिगृही
जन्म घेशी जनहिता

ब्रह्मा विष्णू महेश्वरां
तेज घेतले अंकिता
पुष्प वृष्टी स्वर्गातूनि
महिषासुरा जिंकिता

चतुर्भुजा शस्त्र धारी
महा शक्ती पद्महस्ता
काळजी त्रिलोकांची
विश्वचिंता विश्वातिता

पावसी सत्यसाधका
मा आज्ञा चक्रस्थिता
स्वर्ण वर्णाम् त्रिनेत्री
गं रत्न कुंडल मंडिता

धर्म अर्थ काम मोक्ष
साधने हो परिपूर्णता
रोग भय क्रोध हाव
दुर्गुणां होती चूर्णता

सिंहारूढ ते रौद्ररूप
राक्षसा भय चकिता
थरारली असूर योनी
मुकटोज्वलांदेवता

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# ...तर पुण्याचा बिहार होईल



**बो**पदेव घाटात गुरुवारी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली. ही घटना ताजी असतानाच पुण्यातच दोन शाळकरी मुलींवर स्कूल व्हॅन चालकाने अत्याचार केल्याची घटना समोर आली या दोन घटनांनी पुणे शहर हादरले.

अर्थात सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याला महिला अत्याचाराच्या घटना नवीन नाहीत. गेल्या वर्षभरात पुण्यात महिला अत्याचाराच्या घटनात सातत्याने वाढ होत आहे या घटनांनी सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याची मान शरमेने खाली झुकत आहे. मागील वर्षी राजगडाच्या पायथ्याशी दर्शना पवार नावाच्या उच्च शिक्षित मुलीची हत्या झाली होती. त्याचवेळी सदाशिव पेठेत भर दिवसा युवतीचा पाठलाग करून तिच्यावर कोयत्याने वार करण्याची घटना घडली होती प्रसंगावधान राखून एका युवकाने कोयता हिसकावून घेतल्याने त्या युवतीचे प्राण वाचले.

सातत्याने घडणाऱ्या या घटनांनी पुण्यातील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटना पुण्यासारख्या देशाच्या सांस्कृतिक राजधानीत आणि विद्येच्या माहेरघरात घडल्याने पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची मान शरमेने खाली झुकली आहे. एकेकाळी पुणे हे मुलींसाठी सर्वात सुरक्षित शहर समजले जात होते मात्र मागील काही वर्षापासून पुण्याची ही ओळख पुसली जात आहे. पुण्यात मागील सहा महिन्यात महिला अत्याचाराच्या ३६० घटना घडल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. पुणे हे विद्येचे म हेरघर समजले जाते. सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणाऱ्या सर्वोत्तम संस्था पुण्यात आहे. पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातच नाही तर जगात प्रसिद्ध आहे. शिवाय एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था पुण्यात आहेत.

त्यामुळे पुण्यात उच्च शिक्षणासाठी संपुर्ण देशातून विद्यार्थी येतात त्यात मुलींची संख्या लाक्षणिक असते. या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत किमान चार ते पाच वर्षे लागतात. या चार पाच वर्षात या विद्यार्थ्यांचा मुक्काम पुण्यातच असतो. काही विद्यार्थी वसतिगृहात राहतात तर काही विद्यार्थी ग्रुप करून खाजगी खोली घेऊन भाडेतत्त्वावर राहतात. शिक्षणासाठी देशातील विविध भागांतील विद्यार्थी एकत्र येतात त्यांच्यात मैत्री होते कधी कधी या मैत्रीचे रूपांतर प्रेमात होते. कुटुंबापासून दूर असल्याने त्यांना कोणी हटकायलाही नसते.

काही दिवस प्रेमात निघून गेल्यावर त्यांच्यात वाद निर्माण होतो मग दोघांचे ब्रेकअप होते मग त्यातूनच तू मेरी नही हो सकती तो किसीं की नहीं हो सकती या बॉलीवूडपटातील नायकाप्रमाणे मुले मुलींना त्रास देतात त्यातून मुलींवर अत्याचार आणि हत्या अशा घटना घडतात. काही वेळा एकतर्फी प्रेमातून तर काही वेळा गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून अशा घटना घडतात. आता तर शाळकरी मुलींवर देखील अत्याचार होऊ लागले आहे.

जर अशा घटना घडतच राहिल्या तर पालक पुण्यात आपल्या पाल्याला शिकायला पाठवणार नाही. पुण्यातच नाही तर कोणत्याच शहरात पाठवणार नाहीत कारण पुण्यासारख्या शहरात जर मुली सुरक्षित राहू शकत नाही तर ती कुठेच सुरक्षित राहू शकत नाही अशीच पालकांची धारणा आहे. सभ्य लोकांचे सुसंस्कृत शहर ही पुण्याची ओळख इतिहासजमा होते की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण पुण्यात अलीकडे गुन्हेगारी मोठया प्रमाणात वाढली आहे.

पुण्यात कोयता गँगने दहशत माजवली आहे. भर दिवसा मुलींची हत्या होत आहे याचाच अर्थ हल्लेखोरांना कायद्याचा धाक उरला नाही आपण काहीही केले तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही अशीच धारणा गुन्हेगारांची झाली आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा भीती वाटत नाही. भर दिवसा जर अशा घटना घडत असतील ती पुणे पोलिसांसाठी नामुष्कीची बाब आहे. पुण्यात गुन्हेगारी अशीच वाढत राहिली तर भविष्यात पुण्याचा बिहार होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर पोलिसांनी पुण्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी कठोर पावले उचलायला हवीत. महिला अत्याचार किंवा भर दिवसा मुलींवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला तरच सभ्य लोकांचे सुसंस्कृत पुणे ही पुण्याची ओळख कायम राहील अन्यथा पुण्याचा बिहार होईल.

– श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## किसान सन्मान निधी योजना शिबिरात शेतकऱ्यांनी केली नोंदणी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, शिरपूर :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये आर्थिक मदत केली जाते. काही पात्र शेतकरी काही त्रुटीअभावी व नविन नोंदणी केली नसल्यामूळे हा लाभ घेऊ शकत नाही. त्यांच्यासाठी शिरपूर तहसिल कार्यालय मार्फत आदिवासी भागातील गावपातळीवर तलाठी यांच्याकडून शिबिराचे आयोजन केले आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना ही सर्व लहान आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये उत्पन्नाचा आधार म्हणून तीन हप्त्यात ही रक्कम देण्यात येते. पण अनेक शेतकरी किरकोळ कारणांमुळे योजनेपासून वंचित राहातात काही शेतकऱ्याकडून नोंदणी होत नाही. त्या कारणामुळे पीएम किसान योजनेचा पैसा शेतकऱ्यांना मिळत नाही. या अनुषंघाने शिरपूर तहसिलदार महेंद्र माळी, प्रांतअधिकिरी शरद मंडले यांच्या आदेशाने बोराडी सर्कल सुपन पावरा यांनी शेमल्या (ता. शिरपूर) येथे तीन ऑक्टोंबर पासुन गावात किसान सन्मान निधी योजना शिबिराचे आयोजन केले आहे. याशिबिरात नविन नोंदणी, आधार कार्डनुसार नावात दुरस्ती, नविन नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना मान्यता देणे. यासाठी लागणारे कागद पत्र आधार कार्ड, वन जमिन प्रमाणपत्र, भौतिक तपासणी, मोबाईल नंबर हे सर्व कागदपत्र नेमुन दिलेल्या कर्मचारी बोराडी तलाठी कीरण चव्हाण, शिरपूर बु। तलाठी अनुराग निकुंभे, किरण चौधरी व मदतीला शिरपूर आमदार कार्यालयातील कर्मचारी यांच्याकडे देऊन ऑनलाईन नोंदणी केली जात आहे. या शिबिराला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ग्रामस्थांनी तहसिलदार माळी व प्रांतअधिकारी मंडले यांचे आभिर व्यक्त करत आहे. या होणाऱ्या शिबिरात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शेमल्या येथील सरपंच नेहा पावरा यांनी केले आहे. सहकार्य ग्रामविकास अधिकारी रामचंद्र गावित, ग्रामपंचायत माजी सरपंच सखाराम पावरा, उपसरपंच तिरंगा पावरा, पोलिस पाटील इंद्रजित पावरा आदी ग्रामस्थ.

## परप्रांतीय फेरीवाल्यांची आपल्या नोंदी ग्रामपंचायत मध्ये कराव्यात मनसेचे सुशांत कोळंबेकर यांची मागणी



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, गुहागर :** परप्रांतीयांच्या व फेरीवाले यांच्या नोंदी जानवळे ग्रामपंचायत मध्ये कराव्यात अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जानवळे शाखा अध्यक्ष सुशांत कोळंबेकर यांनी जानवळे सरपंच जान्हवी विखारे यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख आदरणीय राजसाहेब ठाकरे यांनी केलेल्या मागणी नुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी परप्रांतीयांचे नोंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तालुक्यात विविध क्षेत्रात परप्रांतिय कार्यरत आहेत. त्या सर्वांची आपल्या ग्रामपंचायत हद्दीतील त्यांचे आधारकार्ड पाहुन त्याचे फोटो काढून व इतर महत्वाच्या कागदपत्रांची चाचपणी करुन त्यांची आपल्या दप्तरी नोंद करण्यात यावी. आणि हे परप्रांतीय मजुर कोणासाठी काम करतात ते कुठे राहतात याचीही तपासणी करुन त्याचीही नोंद ठेवावी. जेणेकरुन संभाव्य गुन्हे टळू शकतील तसेच फेरी वाल्यांना गावात फिरण्यास बंदी करण्यात यावी असे गाव बंदीचे फलक लावण्यात यावे. येत्या १५ दिवसात या गोष्टीची अंमलबजावणी करण्यात यावी अशी अपेक्षा शाखाध्यक्ष सुशांत कोळंबेकर यांनी केली आहे. उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी विजय शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रमेश नबैकर सचिन कोळंबेकर, शुभम बैकर, साईराज बैकर, शैलेश आग्रे, हेमंत चिवेलकर, अमित कोळंबेकर तसेच महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तायक्वान्डो सबर्बन मुंबई संघटनेची निवडणूक जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** तायक्वान्डो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई जिल्हा संघटनेची चौवार्षिक निवडणूक १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी सायं.५ वाजता स्टार फिटनेस अकॅडमी. ५- कांजूरम र्ग पोलिस स्टेशनच्या बाजूला, कांजूरमार्ग (पू.), मुंबई -४०००४२. येथे घेण्यात येणार आहे. संघटनेचे अध्यक्ष कै. विनायक गायकवाड सर यांच्या निधना नंतर तायक्वान्डो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेवर तायक्वान्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांच्या वतीने ऍड हॉक कमिटी काम पाहत होती. अ‍ॅड हॉक कमिटी तर्फे २१ सप्टेंबर २०२४ रोजी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, पनवेल येथे सर्व अकॅडमीची विशेष सर्व साधारण सभा घेण्यात आली होती. या सभेत २०२४-२०२८ निवडणूक प्रक्रिया कुठे, कधी घ्यावयाची हे ठरले. तसेच निवडणूक अधिकारी म्हणून सर्वांनी मिळून धन्यकुमार तळणकर (उच्च न्यायालय) यांची निवड केली. तसेच या सभेमध्ये एकूण १४ अकॅडमींनी सहभाग नोंदवला होता.

२१ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अ‍ॅड हॉक् कमिटीचा अहवाल तायक्वान्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. तायक्वान्डो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई जिल्हा संघटनेची निवडणूक दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी तायक्वान्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई राज्य संघटनेच्या निरीक्षकांच्या उपस्थित पार पडणार आहे.

## राष्ट्रीय/राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या नावाच्या फलकाचे अनावरण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.७, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय/राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या फलकाचे अनावरण जिल्हा परिषद प्राथमिक विभाग नागपूर येथे तेव्द्धेश्वर काळूसे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागपूर, रोहीणी कुंभार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागपूर, जयेश वाकोडकर उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागपूर यांचे हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन सुनील नायक यांनी केले केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बळीराम चापले, गजानन कुरवाडे, डॉ. प्रदिप बिबटे, डॉ शारदा रोशनखेडे, दिप्ती बिष्ट, रंजना सोरमारे, माया गेडाम, शुभांगी पोहरे, ज्योती कोहळे, ज्योतीमणि रॉक, एकनाथ पवार,किसना गवळी, डॉ मनोहर नंराजे, ओकारनाथ दाणी, घनश्याम पाटील, शेषराव घाटोळे, पक्षभान ढोक, कीर्ती पालटकर, मनिषा शाहाकार, डॉ. शुभ्रा रॉय, गोविंदा ढाले, सतिश पुंड, दिलीप केने, सचिन चव्हाण, भास्कर जांभुळकर, चित्रा मजूमदार, सुनील कोडापे, महेंद्र सोनवाने, घनश्याम सरयाम, उल्हास इटानकर ,अनिता गेडाम, डॉ लिना निकम, प्रतिभा लोखंडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विजया कोकमवार यांनी केले.

## गुहागर मनसे आयोजित गणेश आरती व गौरी सजावट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, गुहागर : मनसेच्या पालशेत विभागातील विविध पदांची नियुक्ती करण्यात आली असून पालशेत विभाग अध्यक्ष पदी प्रसाद विखारे, पालशेत विभाग महिला अध्यक्षपदी अनिता दणदणे, तर निवोशी विभाग अध्यक्ष पदी संदेश धावडे,उपाध्यक्षपदी अनिल दणदणे अशी पद नियुक्ती करण्यात आली.**




महाराष्ट्र नवनिर्माण सेना (गुहागर) पालशेत शाखेच्या वतीने आयोजित आणि मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या संयोगाने पालशेत -बोऱ्या विभाग मर्यादित गणेशोत्सवात गणेश आरती व गौरी सजावट स्पर्धा -२०२४ अशी लक्षवेधी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, त्याचा निकाल जाहीर करण्यात येऊन नुकताच विजेते व सहभागी यांचा बक्षीस वितरण सोहळा सोमवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी शृंगारतळी येथील मनसे कार्यालय येथे मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी,जिल्हाध्यक्ष संतोष नलावडे, उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर,यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सदर स्पर्धेतील गणेश आरती विजेते प्रथम क्रमांक: सचिन सुधाकर साळवी (अडूर), द्वितीय क्रमांक: प्रविण गोपाळ पालशेतकर(पालशेत-बाजारपेठ), तृतीय क्रमांक: समस्त दणदणेवाडी भावकी (निवोशी), तर गौरी सजावट विजेते प्रथम क्रमांक: मनाली रमेश जाक्कर (पालशेत), द्वितीय क्रमांक: गुंतता गुरुनाथ जाक्कर (पालशेत), तृतीय क्रमांक:दणदणेवाडी भावकी -समस्त महिला (निवोशी), तालुका स्तरीय विशेष उत्तेजनार्थ : अर्पिता अनिल काताळे (पाच घराणं- वाकी) याप्रमाणे सर्व विजेत्याना रोख रक्कम, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर दोन्ही स्पर्धेचे परीक्षक म्हणून दिपक वेलुंडे-मुंबई( कोकण संस्कृती संवर्धक), संदेश सांगळे -गुहागर (सांस्कृतिक कार्य), प्रांजळ वेलुंडे - मुंबई (कला शाखा विद्यार्थ्यांनी) यांचे विशेष परिक्षण सहाय्य लाभले, सदर बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी पालशेत-बोऱ्या विभागातील गणपती कारखानदारांचे विशेष सन्मान करण्यात आला,तर नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत उपस्थित महिलांना साडी भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याचबरोबर पालशेत विभागातील विविध पदांची नियुक्ती करण्यात आली असून पालशेत विभाग अध्यक्ष पदी प्रसाद विखारे, पालशेत विभाग महिला अध्यक्षपदी अनिता दणदणे, तर निवोशी विभाग अध्यक्ष पदी संदेश धावडे, उपाध्यक्षपदी अनिल दणदणे अशी पद नियुक्ती करण्यात आली, आपले सण, हिंदूसंस्कृती, परंपरा जोपासण्यासाठी आपण विविध उपक्रमातून संघटित होत आहात हे भूषणावह आहे,मनसेच्या वतीने असे विविध उपक्रम भविष्यात राबविले जातील असे गांधी यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले व आगामी दसरा, दीपावली सणाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाला तालुका उपाध्यक्ष सुनिल हळदणकर, गुहागर शहर अध्यक्ष नवनाथ साखरकर, शेतकरी कामगार सेना अध्यक्ष प्रसाद कुष्टे आदि मनसे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पालशेत विभाग अध्यक्ष प्रसाद विखारे आणि सहकारी कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

## मनसे आयोजित राज्यस्तरीय शिक्षक सन्मान सोहळ्यात ३२ जणांचा गौरव

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.७, पंढरपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्या वतीने पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय उपक्रमशील संस्था, उपक्रमशील शाळा, राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी अशा ३२ जणांना मनसे नेते व सहकार सेनेचे राज्य अध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवण्यात आले.

हा मनसे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा रविवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी येथील शेठ मोरारजी कानजी सभागृह स्टेशन रोड पंढरपूर येथे मोठ्या दिमाखात पार पडला. या पुरस्कार सोहळ्यासाठी राज्यभरातून पुरस्कारास पात्र ठरलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या कुटुंबासह उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर मनसे पुणे शहर महिला अध्यक्ष वनिता वागसकर, मनसे शिक्षक सेना प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के, मनसे शिक्षक सेना राज्य उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, मनसे शिक्षक सेना राज्य सचिव विश्वास गजबार, मनसे सोलापूर जिल्हा अध्यक्ष विनायक महिंद्रकर, मनसे सोलापूर जिल्हा अध्यक्ष



प्रशांत गिड्डे, सोलापूर लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, मनसे विद्यार्थी सेना राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, मनसे सोलापूर शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, मनसे विद्यार्थी सेना जिल्हा अभिषेक रंपुरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना मनसे नेते दिलीप बापू धोत्रे म्हणाले की.... शिक्षक शिक्षिका या बंधू-भगिनींना कोणतीही अडचण त्यांच्या शैक्षणिक कार्याचे बाबतीत येत असेल तर मला जरूर सांगा मी इथे अडचण दूर केल्याशिवाय राहणार नाही. आज या शिक्षक पुरस्कार सोहळ्याला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून गुणवंत शिक्षक हे या ठिकाणी आलेले आहेत. या शिक्षकांमध्ये नंदुरबार येथील एक शिक्षिका आदिवासी भागामधून आलेली आहे ती तिचे कौतुक करावं तेवढं कमीच आहे. नंदुरबार सारख्या आदिवासी भागातून आलेल्या शिक्षिका भगिनीने जे मत व्यक्त केले. त्या आपल्या भाषणामध्ये म्हणाल्या की ८० टक्के आदिवासी मुलं हे शिक्षण घेत आहेत आणि अशा दुर्गम भागात असलेल्या या शिक्षका भगिनींचे कौतुक करावे तेवढे थोडे कमीच आहे असे उद्गार दिलीपबापू धोत्रे यांनी यावेळी काढले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे साहेब आहेत. आपल्या कोणत्याही अडीअडचणी समस्या सांगा आम्ही त्या अडचणीचे,समस्येचे निरसन केल्याशिवाय राहणार नाही व शिक्षक शिक्षकांना न्याय दिल्याशिवाय गप्प बसणार नाही. असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पुरस्कार सोहळ्यामध्ये व्यक्त केले. यावेळी अशोक कोळी, मनोज साळुंखे, बाळकृष्ण लाड, बाळासाहेब आवारे, परशुराम घाडगे, धुंडनना कोळी, मंगल मुळीक, जयश्री जमादार, वीरसंगप्पा भोज, युवराज जगताप, संतोष कोळी, विनायक शेळके, शरद काळे, सुरेश महानुर, अविनाश पाटील यांच्यासह पंढरपूर-मंगळवेढा येथील शहर व तालुक्यातील मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील नागरी आणि पायाभूत समस्यावर तोडगा...

**अक्षराज : अजय पुजारी**

**दिंडोशी :** दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने शिवसेना नेते आमदार सुनील प्रभू यांनी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील शिवसेना पदाधिकाऱ्यांसह बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतली. यावेळी संचालक सहआयुक्त आयुक्त कार्यालय चंद्रशेखर चोरे, सहआयुक्त परिमंडळ ४ विश्वास शंकरवार, उपायुक्त पायाभूत सुविधा महाले उपायुक्त किरण दिघावकर, व इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी दिंडोशी विधानसभा क्षेत्रात होणारा अपुरा पाणीपुरवठा नियमित करण्यासंदर्भात तसेच नागरी निवारा मध्ये नविन जल वहिनी टाकणे जल अभियंता माळवदे यांच्या सोबत चर्चा झाली. दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील वन क्षेत्रात केमिकल बायो टॉयलेट बसविण्याची मागणी केली त्या नुसार ७ नविन बायो टॉयलेट लावण्यात येणार असून इतर आवश्यक ठिकाणी देखील लावण्यात येतील अशी माहिती किरण दिघावकर यांनी दिली.

पिंपरी पाडा ते जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग यांना



जोडणारा १२० फुटाचा डीपी रस्ता, संस्कार कॉलेजातील प्रस्तावित विकास नियोजन रस्ता देखील टप्प्याटप्प्याने विकसित करण्याबाबतची माहिती आयुक्तांनी दिली. या रस्त्यांच्या विकासात बाधित होणाऱ्या पात्र घरांचे पुनर्वसन करण्याकरिता महापालिका पिटीसी स्थानिक क्षेत्रातच विकत घेऊन तेथे पात्र नागरिकांचे पुनर्वसन करून रस्ता विकसित करण्यात येणार आहे.

तसेच बाधित होणाऱ्या व्यावसायिक गाड्यांना रेडिरेकर रेट प्रमाणे आर्थिक मोबदला देऊन अथवा नव्याने निर्माण होणाऱ्या मंडईमध्ये स्थलांतरित करण्यात येणार आहे. स्थळ परिस्थितीनुसार रस्ते विकासात बाधित होणाऱ्या घरांचे स्थलांतर आजूबाजूला सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात समाविष्ट करून रस्त्याचा विकास करण्यात येणार आहे. रस्ते विकासासोबतच दिंडोशी विधानसभा क्षेत्रात आवश्यक ठिकाणी रस्ते विभाग व मलनिःसारण विभाग यांच्या सह समन्वयाने मलनिःसारण वाहिन्या देखील बनविण्यात येणार आहेत. या अंतर्गत तानाजी नगर ते आर दक्षिण विभाग हद्द येथ पर्यंत मलनिःसारण वहिनी टाकण्याची मागणी करण्यात आली. तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते खराब झाल्याने रस्त्यांचे समतलिकरण करावे अशी मागणी केली असता हे काम लवकरात लवकर करण्यात येईल अशी माहिती उप प्रमुख अभियंता रस्ते पश्चिम उपनगरे बोरसे यांनी दिली. तसेच इतर रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सुरू होईल अशी माहिती बोरसे यांनी दिली.

तसेच यावेळी वन खात्याच्या जमिनीवरील झोपड्यांना मूलभूत सुविधा देणे, शौचालय दुरुस्ती, जल जोडणी देणे बाबत धोरण तयार करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी आमदार प्रभू यांनी केली. त्यासोबतच आवश्यक ठिकाणी घर गल्ल्या, गटारे, पदपथ, सभा मंडप दुरुस्त करण्यात यावेत अशी मागणी देखील आमदार सुनील प्रभु यांनी केली.

## पानगाव येथील रेणुका मंदिरामध्ये तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०७, पानगाव (रेणापूर) :** १८ व्या शतकात स्थापित झालेले येथील भवानी मातेचे मंदिर हे माहूर गडावरील रेणुकामाते चे दुसरे ठाणे म्हणून परिसरात परिचीत आहे. आजही अत्यंत जाज्वल्य देवस्थानात पानगावच्या रेणुकामातेची गणना होते. नवरात्री च्या काळात दर्शनाकरिता दिवस रात्र भक्ताची गर्दी असते. सोमवार दि.७ रोजी तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची वेद शास्त्र, मंत्रोचारात प्रतिष्ठापणा करण्यात आली.

नवरात्रीमध्ये मंदिर समितीच्या वतीने विविध सांस्कृतीक कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले आहे. वाग्या मुरुळी, जागर, गोंधळ, कीर्तन असे विविध सांस्कृतीक कार्यक्रम दररोज रात्री घेतले जात आहेत. या मंदिरात पूर्वी पासून स्थापन असलेली तुळजापूरच्या देवीच्या मूर्तीची पूजा व आरती होत असे परंतु काळाच्या ओघात मंदिराची दुरवस्था झाली, पडझड झाली. मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम करत असताना त्या कामामध्ये तुळजाभवानी मातेची मुर्ती भंग पावली हिन्दू शास्त्रा प्रमाणे भंग पावलेल्या मुर्ती ची पूजा केली जात नसल्यामुळे माजी सरपंच चंद्रचूड चव्हाण व मंदिरसमीती यांनी नवीन मुर्ती घेतली त्या मूर्तीची प्रतीस्थापना करण्यात आली. सध्या नवरात्री सुरु असल्या मुळे सर्वत्र देवीचा जागर सुरु आहे या काळात देवी जागृत असते त्यामुळे मंदिर समीतीने नवरात्रीच्या पावन पर्वामध्ये मूर्ती स्थापन करण्याचा निर्णय घेणात आला. शनिवार दि.०५ पासून मूर्ती स्थापना करण्याचा विधी सुरु झाला पहिल्या दिवशी मूर्ती वाजत गाजत मंदिरात आणुन ती पाण्यात ठेवण्यात आली दुसऱ्या दिवशी रविवार दि.६ रोजी होम करून मूर्तीला दही- दुधाचा अभिषेक करून मूर्ती धान्यामध्ये ठेवण्यात आली सोमवार दि. ७ सकाळी ११ वाजता शशिकांत पानगावकर व सुनिता पानगावकर यांच्या हस्ते मूर्तीची विधीवत पूजा, होम, पुर्णाहुती करून भागवताचार्य अनिल धर्माधिकारी व अनंत धर्माधिकारी शास्त्रशुध्द वेद मंत्रोचारात तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी मंदिर समीतीचे सदस्य तसेच ऊत्सव समीतीचे सदस्य मोठ्या संख्येने ऊपस्थित होते.

अक्षराज
४ बुलडाणा,मंगळवार, दि.०८ ऑक्टोबर २०२४ संमिश्र

# निलेश लंके प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनची तयारी युद्ध पातळीवर सुरू

## दीपावलीच्या कालखंडातील कृषी प्रदर्शन ठरणार शेतकरी व व्यवसायिकांसाठी पर्वणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अ.नगर) :** नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीचे खासदार निलेश लंके व मा.जि.प.सदस्या, राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) व निलेश लंके प्रतिष्ठान आयोजित ,पी जे,एम, इव्हेंट मॅनेजमेंट काष्टी यांच्या नियोजना खाली सालाबाद प्रमाणे या ही वर्षी दिनांक १७ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०२४ दरम्यान राज्यस्तरीय कृषीप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

माझ्या शेतकरी बांधवांपर्यंत कृषी क्षेत्रातील वेगवेगळे नवीन तंत्रज्ञान कृषी विषयक माहिती पोहोचवता येईल व नवनवीन अवजारे खते बी बियाणे सह कृषी विषयक विविध उपकरणांचा व माहितीचा त्यांना लाभ होईल हा माणस



ठेवून गेल्या अनेक वर्षापासून पारनेर येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असते.

कृषी क्षेत्रातील पारनेर येथील राज्यस्तरीय कृषीप्रदर्शन महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन असून यामध्ये पारनेर सह संपूर्ण म हाराष्ट्र मधून नवनवीन तंत्रज्ञानाचे उत्पादन करणाऱ्या कंपनीचे स्टॉल पारनेरमध्ये मिळविण्या साठीची मागणी व्यापारी वर्गात वाढत असून या वर्षी १५०-२०० स्टॉल सहभागी होणार आहेत. तालुक्यासह जिल्हा भरातील शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी व्यावसायिक यांच्यामध्ये कृषी प्रदर्शनाला भेट देऊन माहिती घेण्यासाठी उत्सुकता वाढली असुन

या वर्षी नेहमी प्रमाणे २ ते ३ लाख शेतकरी बांधव भेट देणार असल्याची माहिती समोर येत आहे. या कृषी प्रदर्शनामध्ये प्रमुख आकर्षण म्हणजे डबल हिंदकेसरी सम्राचॅम्पियन, एक कोटी किंमतीची सोन्या मोन्या बैल जोडी पहावयास मिळणार असून मधुमक्षीका पालन, गोपालन, सेंद्रिय, जैविक, रासायनिक खते, नवीन ट्रॅक्टर, अवजारे, शेततळ्यांचा कागद, ठिबक सिंचन, शासकीय अनुदान यांची सर्वसमावेशक माहिती, नर्सरी,

दूध काढणी यंत्र, सुधारीत बी-बियाणे महिलांना घरबसल्या स्वतः चा व्यवसाय चालू करण्याची माहिती, महिलांसाठी गृहोपयोगी वस्तूंचे स्टॉल्स, खवय्यांसाठी कोल्हापूरचा तांबडा पांढरा रस्सा, तसेच सांगली सातारा कोल्हापूर सह कोकणातील आकर्षक खाऊ गल्ली, लहान मुलांसाठी किड्स झोन असे सर्व समावेशक कृषी प्रदर्शन पहावयास मि ळणार असल्याची माहिती नियोजक बंडू पाचपुते व गणेश जठार यांनी दिली.

या कृषीप्रदर्शना संदर्भात अधिक माहिती हवी असेल तर ९३२२९३८४४७ / ७५५८३९४०४३ या नंबरवर संपर्क करावा. असे आवाहन निलेश लंके प्रतिष्ठान आयोजक मंडळाकडून करण्यात येत आहे.

# मुदखेड आठवडे बाजारपेठ बंद; शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे नुकसान

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरात अज्ञात समाजकंटकांकडून एका महाराजांच्या प्रतिमेस जोडे मारून आपला निषेध नोंदविल्या प्रकरणी दोन समाजात तणाव निर्माण होऊन दिनांक ०६ ओकॉटबेर रोजी आठवडी बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. अचानक पाळण्यात आलेल्या बंदमुळे किरकोळ व्यापाऱ्यांसह शेतकऱ्यांचे मालाचे मोठे नुकसान झाले मुदखेड पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे दोन समाजात होणारा उद्रेक टळला असून शहरात तणावपूर्ण वातावरणानंतर दुपारी शांतता निर्माण झाली असल्याचे दिसून आले.

काही उत्साही मंडळींनी आपसात चिथावणीखोर वक्तव्य केल्यामुळे व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपली बाजारपेठ बंद ठेवली. दरम्यान शहरात पोलिसांचा म ोठा लवाजमा दाखल झाला व जमावास पांगविण्यात आले. तर दुसऱ्या घटनेत येथील एका कार्यकर्त्याने पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून धार्मिक भावना दुखविल्या प्रकरणी एका महाराजा विरुद्ध गुन्हाची नोंद करण्यात आली असून सदरचा गुन्हा गाजियाबाद उत्तर प्रदेश या ठिकाणी वर्ग करण्यात येणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. अन्य एका घटनेत दोघांविरुद्ध पोलिसांनी एनसी नोंद केली असल्याची समजते.

शहरामध्ये झाल्या प्रकाराची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी कळविल्यानंतर भोकरचे अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन हे तातडीने पोलिसांच्या लवा जाम्यांसह शहरात दाखल झाले व शहरातील दोन्ही समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती व व्यापाऱ्यांना बोलावून पोलीस ठाण्यात एका बैठकीत शांतता ठेवण्याचे आवाहन केले.

त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली व शहरात पोलिसांच्या सतर्कतेमुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. दुपारनंतर हळूहळू बाजारपेठेत काही व्यवहार सुरळीत सुरू झाले वैद्यकीय सेवा ही सुरळीतपणे



सुरू होती. दरम्यान शहरात उद्भवलेल्या या तणावाच्या परिस्थितीमुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शांतता निर्माण व्हावी.

कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता योग्य ती खबरदारी म्हणून मुख्य ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त अद्यापही ठेवण्यात आला असून शहरातील नागरिकांनी सामाजिक जाणिवेच्या भूमिकेतून शांतता राखावी असे आवाहन या निमित्ताने पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले आहे.

# पारनेर तालुक्यातील हजारो नागरिक विविध शासकीय योजनापासून वंचित

## वंचितांना न्याय देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार



पारनेर तालुक्यातील हजारो नागरिक शासकीय योजनांचा लाभ ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी अपूर्ण कागदपत्रां अभावी वंचित आहेत. आम्ही या नागरिकांच्या कागदपत्रांची पूर्तता करून या वंचित असलेल्या नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

**भाऊसाहेब खेडेकर, सामाजिक कार्यकर्ते**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अ.नगर) :** ज्येष्ठ नागरीक, विधवा, परित्यक्ता, शेतकरी, लाडकी बहिण, रेशन कार्ड धारक, मतदान कार्ड, संजय गांधी निराधार योजना, नमो किसान, पी एम किसान, यासारख्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यापासून पारनेर तालुक्यातील हजारो नागरिक अजूनही वंचित आहेत.

त्यांच्या अपूर्ण कागद पत्रांची पूर्तता करून घेण्यासाठी व सर्वसामान्य नागरिकांना एक सामाजिक आधार देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते,सेतू चालक यांनी पारनेर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी तालुक्यातील हजारो शासकीय योजना पासून वंचित नागरिक उपस्थित होते.

सर्व सामान्य नागरिक यांना शासकीय योजनाचा लाभ घेण्या साठी अनेक कागद पत्रांची पूर्तता करावी लागते. स्थानिक पातळी वरील ग्रामसेवक, तलाठी, सरपंच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करत नसल्याने नागरिक शासनाचे विविध योजना पासून वंचित राहत आहेत.

या नागरिकांना शासकीय योजनाचा ऑनलाईन पद्धतीने लाभ मिळून देण्यासाठी पारनेर शहरातील सामजिक कार्यकर्ते भाऊसाहेब खेडेकर यांनी सामाजिक उपक्रांअंतर्गत शहरातील बाजार तळ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील खेड्यापाड्यात हजारो नागरिक या शिबिराचा लाभ घेण्यासाठी उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब खेडेकर यांनी उपस्थित नागरिकांच्या शासकीय योजनांची ऑनलाईन पद्धतीने लाभ घेण्यासाठी लागणाऱ्या कागद पत्रांची पूर्तता करण्यासाठी योग्य म ार्गदर्शन केले. उपस्थित नागरिकांची कागद पत्रांची पडताळणी करून शासकीय योजनाचा ऑनलाईन पद्धतीने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

# सरपंच आपल्या दारी योजना आपल्या घरी उपक्रम

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०७, जव्हार (पालघर) :** सरपंच आपल्या दारी योजना आपल्या घरी हा कल्याणकारी योजना सर्व समान्यांच्या दारी उपक्रम सुरुवात झाली असून पालघर जिल्हातील पहिला उपक्रम हा स्वखर्चातून राबविला जात आहे.

शिवसेना तालुका प्रमुख विनायक राऊत, जिल्हा परिषद सदस्य गुलाब विनायक राऊत व लोकनियुक्त सरपंच कल्पेश विनायक राऊत यांच्या संकल्पनेतुन आपल्या ग्रामपंचायत कासटवाडी मधील सर्व गावापाडयातील घरांचा सर्व्हे होणार असून आपल्या ग्रामस्थांच्या विकासकामांबद्दल अडचणी योजनांचा लाभ पि. एम. जनमन अंतर्गत लाभार्थी निवड आधारकार्ड, जातीचा दाखला, मतदान कार्ड, घरकूल, रेशनकार्ड,



जॉबकार्ड, बनपट्टा धारक, अपंग, निराधर, विधवा, परिपक्वता आसनाच्या विविध प्रकाराचे योजना जेणे करून आपल्या ग्रामस्थांनी सर्वांनी अपेक्षित कागदपत्रे व शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यात येईल.

या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण युवा रोजगार प्रशिक्षण योजना, म ुलींसाठी लेक लाडकी योजना, वयोश्री योजना, तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, आनंद दिघे दिव्यांग योजना. अशा सर्वच योजने पासून कोणी वंचित राहू नये अथवा एखादा गरीब आणि गरजूंना त्यांचा म ोफत लाभ मिळावा. या हेतूने हा उपक्रम राबवून घेतला जात आहे.

या प्रसंगी कल्पेश विनायक राऊत लोकनियुक्त सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कासटवाडी, ग्रामविकास अधिकारी किशोर सोनवणे, उपसरपंच त्रंबक रावते, ग्राम सदस्य, शंकर इल्हात, नितीन टोकरे, कुणाल सापटा, नितीन चौधरी, अशोक इंधन,

कल्याणी राऊत, सुलोचना चौधरी, राजश्री टोकरे, चंद्रा पवार,मोनिका खिरारी, सुचिता होळकर, ग्राम कर्मचारी, प्रमोद खोटरा, किरण जांजर, ग्रामस्थ आणि लाभार्थी उपस्थित होते.

# थोडक्यात

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी साहित्यिकांची सहविचार सभा संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, पालघर :** पालघर जिल्ह्यातील आदिवासी साहित्यिकांची ऐतिहासिक जव्हार येथील राजे यशवंत सार्वजनिक वाचनालयात सहविचार सभा अत्यंत उत्साहात रविवार, दिनांक ०६ ऑक्टोबर रोजी पार पडली. सभेची सुरुवात आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित आदिवासी साहित्यिकांनी आदिवासी संस्कृती आणि साहित्यावर विचारमंथन केले. या सभेत डॉ. सखाराम डाखोरे यांनी आदिवासी साहित्याची सद्यस्थिती या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे, डॉ.चेतन गुरोडा यांनी आदिवासी संस्कृती आणि आदिवासी साहित्य यावर विस्तृत विचार मांडत आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष देवचंद महाले यांनी आपल्या भाषणातून आदिवासी संस्कृतीचे मोल अधोरेखित केले आणि नवोदित आदिवासी साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. सभेत सर्वानुमते, पालघर जिल्ह्यात आदिवासी साहित्यिकांची परिषद स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या परिषदेच्या स्थापनेसाठी एक समिती गठित करण्यात आली असून, त्यात पालघर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील आदिवासी साहित्यिक, कवी, लेखक यांचा सदस्य म्हणून सम ावेश असेल, तर गठीत केलेल्या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून रवी बुधर,उपाध्यक्ष चंद्रकांत घाटाळ सचिव किशोर डोके, खजिनदार प्रा.सुधीर भोईर सह खजिनदार मनोज कामडी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच सल्लागार पदी डॉ. सखाराम डाखोरे, डॉ.चेतन गुरोडा, डॉ.राजू शनवार, सचिन सातवी यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच संघटक म्हणून पालघर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील दोन ते तीन सदस्य घेण्याचे सर्वानुमते ठरले. परिषद स्थापन करण्याचा उद्देश आदिवासी साहित्यिकांना एकत्र आणणे, नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देणे, तसेच आदिवासी साहित्याला लिखित स्वरूपात प्रकाशित करणे त्याचबरोबर, दरवर्षी पालघर जिल्ह्यात आदिवासी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवी बुधर यांनी केले. सूत्रसंचालन किशोर डोके व आभार प्रदर्शन प्रा.सुधीर भोईर यांनी केले. या सहविचार सभेला अनेक पत्रकार बंधू व जिल्ह्यातील ५० पेक्षा जास्त साहित्यिक उपस्थित होते. सदर कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला व उपस्थितांनी आदिवासी साहित्यिकांच्या उज्वल भविष्याबद्दल सकारात्मक विचार व्यक्त केले.

## शेकापचा विविध मागण्यासाठी तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शनिवारी पालम तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला .हा मोर्चा पालम येथील ममता माध्यमिक विद्यालयातून निघून मुख्य बाजारपेठ ते तहसील कार्यालयात वाजत गाजत घोषणा देत निघाला. या मोर्चाचे नंतर सभेत रूपांतर झाले. या मोर्चाचे आयोजन तुषार गोळेगावकर यांनी केले तर नेतृत्व लक्ष्मणराव गोळेगावकर, माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड यांनी केले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. तहसीलदारांचे प्रतिनिधी म्हणून महसूल कर्मचारी शिवप्रसाद वायवळ यांनी निवेदन स्वीकारले. सदरील निवेदनात प्रामुख्याने मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये शेतीमालाला हमीभाव देण्यात यावा, शेतकरी शेतमजूर यांना पेन्शन देण्यात यावी, गंगाखेड शुगर एनर्जी कडून शेतकऱ्यांच्या नावावर विविध बँकेतून कर्ज घेतल्यामुळे त्या शेतकऱ्यांना बँका कर्ज देत नाहीत. त्या शेतकऱ्यांना त्वरित कर्ज देण्यात यावे व त्यांनी दिलेली कागदपत्रे शेतकऱ्यांना वापस मिळावी, या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे जीवन उद्धवस्त झाले आहे.

शेतकऱ्यांना न्याय देऊन त्वरित त्यांचे कागदपत्र शेतकऱ्यांच्या सुपूर्द करावी. तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ मदत देण्यात यावी. या व इतर मागण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी भाई लक्ष्मणराव गोळेगावकर, आम दार ज्ञानोबा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.मोर्चात प्रामुख्याने तुषार गोळेगावकर, माणिकराव जाधव, अण्णासाहेब किरडे, बंडु जाधव, शंकरराव पोळ, चांद पाशा पठाण ,ॲड. पांडुरंग पातळे, सिताराम पोळ,मुक्तार पठाण यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेकाप चे कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने मोर्चात उपस्थित होते. यावेळी पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश थोरात यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## इटकूर येथे सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन



**अक्षराज : मुक्ता गिरी**

**दि.०७, ईटकुर (धाराशिव) :** शासकिय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव व श्री लक्ष्मी बहुउद्देशीय सामाजिक संस्था, हासेगाव (शि.) ता. कळंब यांच्या समन्वयाने प्राथमिक आरोग्य केंद्र इटकूर येथे सोमवार, दिनांक ०७ऑक्टोबर रोजी विनामूल्य सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन केले गेले. यामध्ये इटकूर व परिसरातील २०० च्या जवळपास रुग्णांची तपासणी करून घेऊन उपचार घेतले केले गेले. तसेच आवश्यक असणाऱ्या रुग्णांना संदर्भ सेवा सुद्धा देण्यात आली.

या शिबिरामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव येथील तज्ञ डॉक्टरांच्या टीमने व प्रा आ केंद्र इटकूर येथील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व आशा कर्मचारी यांनी सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार व संदर्भ सेवा दिली. यामध्ये मुख्यत्वे शुगर, बीपी या आजारा वरील उपचार व रुग्णांसाठी तपासणी व उपचार, प्रयोगशाळा तपासणी, शस्त्रक्रियेसाठी संदर्भसेवा तसेच इतर सर्व आजारांवर उपचार देण्यात आले.